रिक्षा चालकांचा मेळावा

पनवेल : समाजातील सर्वात उपेक्षित घटक मानला जाणारा रिक्षा चालक मालक यांना व्यवसाय करताना भेडसावणारे प्रश्न सोडवून त्यांना जी–वनात सन्मान मिळवून देण्यासाठी आपण कार्यरत राहू अशी ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिली. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने मंगळवारी (दि. ५) आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात रिक्षा चालक मालक मेळावा झाला.त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर, प्रादेशिक परीवहन अधिकारी अरूण येवला, उप प्रादेशिक परीवहन अधिकारी अनंत पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त दिलीप गोरी, वाहतूक पोलिस शाखेचे वरीष्ठ पोलिस निरीक्षक मोहन पाटील, इंटकचे प्रदशेक कार्याध्यक्ष महेंद्र घरत, नगराध्यक्ष चारूशिला घरत, जेष्ठ नेते डॉ. भक्तीकुमार दवे, माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला, जि.प. काँग्रेस पक्ष प्रतोद राजेंद्र पाटील, उपनगराध्यक्ष मदन कोळी, शशिकांत बांदोडकर, शिवाजी दुर्गे, बांधकाम सभापती राजू सोनी, सिराज सय्यद, श्रीकांत बापट, प्रभाकर जोशी, तालुका महिला काँग्रेसच्या अध्यक्ष ॲड. आशा भगत, गणपत म्हात्रे, गणेश देवकर, अण्णा साबळे, विजय घरत, बाळा जगदाळे, रवि नाईक व रायगड जिल्हा रिक्षा चालक मालक संघटनेचे विविध तालुक्यांचे अध्यक्ष, पदाधिकारी आदी अनेक मान्यवर उपस्थित होते. या वेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, शिक्षणात प्रगती करू न शकलेले अन्य रोजगाराची साधने नसलेला युवक या व्यवसायात येतो. प्रवाशांना सेवा देताना रिक्षा मालकाचे ठराविक पैसे देऊन उर्वरित तुटपुंज्या मिळकतीवर आपल्या कुटूंबाचा चरीतार्थ चालवितो. या उपेक्षित घटकाला आपल्या कौटूंबिक प्रगतीचा सन्मानाचा हक्क आहे. या घटकाला व्यवसायात भेडसावणाऱ्या समस्या सोडवून त्याचा सामाजिक दर्जा उंचावण्याचा विकास व प्रगतीच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्याचा आपला प्रयत्न आहे, असे सांगून ते पुढे म्हणाले की, प्रादेशिक परीवहन अधिकारी अरूण येवला यांच्या सकारात्मक काम करण्याच्या भावनेतून त्यांनी केलेल्या कामामुळे आज दुसऱ्याची रिक्षा चालविणाऱ्या रिक्षा चालकांना रिक्षा मालक होण्याची संधी लाभली आहे. ऑनलाईन फॉर्म मधील चुकीमुळे परमिटपासून वंचित झालेल्यांना दिलासा देण्यासाठी बाळा जगदाळे, रवी नाईक यांच्या टीमने सातत्याने त्याचा पाठपुरावा केला. त्यांच्या चांगल्या कामाला साथ देण्यासाठी आपण वरीष्ठ पातळीवर केलेल्या प्रयत्नांमुळे शासन व प्रशासनाने सकारात्मक पाउल उचलले. त्यातून आज अनेक रिक्षा चालकांना त्याचा लाभ मिळू शकला याचा आपल्याला आनंद आहे, असेही ते म्हणाले.

आज वाढदिवसाच्या निमित्ताने रिक्षा चालक मालकांनी केलेल्या या आपुलकीच्या सत्कारामुळे आपल्यावरील जबाबदारीची जाणीव करून दिली आहे.त्यामुळे समाजात ज्यांच्याकडे तुच्छतेने पाहिले जाते त्या रिक्षा चालकांना सन्मानाची वागणूक मिळवून देण्यासाठी त्यांना भेडसावणाऱ्या अडीअडचणी दूर करून सन्मान मिळवून देण्यासाठी आपण कार्यरत राहू, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

रिक्षा चालकांच्या व्यवसायात समाजाला त्यांच्या सेवेचा चांगला लाभ मिळाला पाहिजे त्यांच्यात शिस्त आली पाहिजे, नव्या कार्यप्रणालींचा वापर झाला पाहिजे परंतु या घटकाला उध्वस्त करून त्यांच्यावर अन्याय करून या गोष्टी होता कामा नये.

–प्रशांत ठाकूर (आमदार)

कामगारनेते महेंद्र घरत म्हणाले की, आमदार प्रशांत ठाकूर केवळ पनवेलचे आमदार नाही तर संपूर्ण रायगड व महाराष्ट्राचे आमदार आहेत. राज्यातील नाव घेण्यासारखा कौतुकास्पद विकास करणाऱ्या बोटावरमोजण्या एवढ्या आमदारांपैकी एक आहेत. पनवेल शहर व तालुक्यात त्यांनी केलेल्या झंझावती विकासातून ते सिध्द करून दाखविले आहे. प्रश्न कोणताही असो प्रामाणिकपणे प्रयत्न करून तो सोडविण्याची त्यांची ख्याती आहे. एक दमदार आमदार म्हणूनच त्यांचेकडे पाहिले जाते. रिक्षाचालक मालक हा समाजातील खऱ्या अर्थाने उपेक्षित घटक. या घटकाला न्याय मिळाला पाहिजे. घटना दुर्घटना कोणतीही असो तिथे सर्वात आधी पोहोचतो मदतीला धावतो तो रिक्षावाला. तोच समाजाचा खरा समाजसेवक आहे. त्याला सन्मान व सुरक्षितता मिळाली पाहिजे. भविष्यात त्याला सुरक्षितता लाभावी या साठी रिक्षा चालक मालकांसाठी एखादे बोर्ड असले पाहिजे. त्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

समाजात रिक्षा चालक–मालक हा सर्वाथाने उपेक्षित घटक आहे. या रिक्षाचालक मालकांना भेडसावणारे प्रश्न त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करून त्या सोडविणारे आमदार तुम्हाला लाभले तुम्ही खऱ्या अर्थाने भाग्यवान आहात असे गौरवपुर्ण उद्‌गार प्रादेशिक परीवहन अधिकारी अरूण येवला यांनी काढले.

ते म्हणाले की, ऑनलाईन परमिट वाटपात या लाभापासून कमी शिक्षणामुळे वंचित रहात असलेल्या जुन्या रिक्षा चालक मालकांना परमिट मिळवून देण्याचे काम सोपे नव्हते. पण आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रामाणिक प्रयत्न त्यासाठी वरीष्ठ पातळीवर त्यांनी प्रश्नाचा केलेला पाठपुरावा यामुळेच संपूर्ण राज्यातील रिक्षा चालक मालकांच्या हिताचा निर्णय घेतला गेला.तुमच्या अडीअडचणी सोडवून समाजात तुम्हाला सन्मान मिळवून देण्यासाठी सतत कार्यमग्न असलेल्या प्रशांत ठाकूर यांच्या गौरवास्पद कामगिरी मुळे तुमचीही जबाबदारी वाढली आहे. प्रवाशांना चांगली सेवा देण्याचे काम तुम्हाला करायचे आहे. तुमच्या एका चुकीमुळे तुमच्या काम करणाऱ्या तरूण तडफदार आमदारांना गालबोट लागू शकते. त्यासाठी तुम्ही जबाबदारी दुर्लक्षुन चालणार नाही. काळाच्या ओघात येऊ घातलेल्या बदलांना आपणही सामोरे गेले पाहिजे.नव्या पध्दतींचा अवलंब केला गेला पाहिजे त्यासाठी आपण निश्चितपणे साथ द्याल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या रिक्षांचा बॅच टॅक्सीसाठी उपयोगी पडणार आहे त्यामुळे उद्या येथे येणाऱ्या विमानतळामुळे टॅक्सी सेवा सुरू करताना त्याचा निश्चित लाभ तुम्हाला मिळेल. त्या संधीचा लाभ रिक्षाचालकांनी घेऊन आपले जीवनमान उंचावले पाहिजे. मिटरचा अवलंब, शेअर रिक्षा अशा नव्या परिमाणांचा वापर करून सेवा अधिक कार्यक्षम करावी असे आवाहनही त्यांनी केले.

या मेळाव्यात वाहतूक सुरक्षितता व इन्शुरन्स बँक लोन आदी बाबींबाबत रिक्षा चालक मालकांना उपयुक्त माहिती देण्यात आली.

या मेळाव्याला परिसरातील रिक्षा–चालक मालक बहुसंख्येने उपस्थित होते.